# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-25.06.2026** **वार- गुरुवार**

---

**नसरापुर अत्याचार-सुनावणी**

नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपी प्रभाकर कांबळे याला पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने दोषी ठरवले असून, शिक्षेची घोषणा २९ जून रोजी करण्यात येणार आहे. ज्या ज्या कलमांखाली खटला चालला ते सर्व गुन्हे सिद्ध झाले आहेत. त्यापैकी दोन गुन्ह्यांमध्ये फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. एका गुन्ह्यात आजन्म जन्मठेपेची तर एका गुन्ह्यात 14 वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतानाही, विविध पुराव्यांच्या आधारे २१ मेपासून दैनंदिन सुनावणी झाल्यानंतर अवघ्या ५५ दिवसांत अंतिम निर्णयाच्या टप्प्यापर्यंत पोहोचलेला हा राज्याच्या न्यायालयीन इतिहासातील अत्यंत वेगानं चाललेला खटला मानला जात आहे.

**लोहगड हत्याकांड**

लोहगड हत्याकांड प्रकरणात विशेष तपास पथक नेमण्याचे निर्देश तालिका अध्यक्ष राजू खरे यांनी आज विधान सभेत दिले . याबाबतचा मुद्दा सभागृहात सुनील शेळके यांनी उपस्थित करताना हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्याची मागणी केली होती त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी याप्रकरणी विशेष तपास पथक नेमण्याची मागणी केल्यावर तालिका अध्यक्ष राजू खरे यांनी हे निर्देश दिले. त्याला हरकत घेत भास्कर जाधव यांनी तालिका अध्यक्ष पदावरील व्यक्तीला असे निर्देश देण्याचे अधिकार आहेत का असा प्रश्न उपस्थित केला त्यावर अध्यक्ष निर्णय देतील असं त्यांनी स्पष्ट केलं.

**सहकार मंत्रालय**

केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला ५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त देशभरात येत्या २९ जून ते ६ जुलै या कालावधीत 'सहकार सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, कृषी संस्था, प्रक्रिया संस्था, ग्राहक संस्थानी या सप्ताहात सक्रिय सहभाग नोंदवावा असं आवाहन सहकार आयुक्त आणि सहकारी संस्था निबंधक, दिपक तावरे यांनी केलं आहे. सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली.

**अवैध वाहतूक कारवाई**

राज्यात अवैध प्रवासी वाहतुकीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मालवाहू वाहनांतून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा वाहनांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत दिली.

राज्यातील वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील ताण लक्षात घेऊन एसटी महामंडळासाठी ८ हजार ३०० नवीन बस गाड्या खरेदी करण्यात आल्या असून पुढील दोन ते तीन महिन्यांत दर अर्ध्या तासाने बससेवा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**जिमाका**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं दिलेल्या विविध सवलत योजनांमुळे आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंत सुमारे ३ लाख ८० हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला आहे. त्यापैकी ३ लाख ६२ हजार ५७ मालमत्ताधारकांनी महापालिकेच्या विविध सवलतींचा लाभ घेतला आहे.

नागरिकांनी ३० जून पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा, असं आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेनं केलं आहे. शनिवार, रविवार तसंच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सर्व क्षेत्रीय कार्यालयात मालमत्ता कर भरता येऊ शकेल.

**बीआरटी**

आळंदी रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या उद्देशाने विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर दरम्यानचा बीआरटी मार्ग काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमतानं पुण्यातील बीआरटी सेवा पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वारगेट–कात्रज आणि नगर रस्त्यावरील बीआरटी मार्ग हटवण्यासही मंजुरी देण्यात आली असून, ही कार्यवाही पुढील आठ दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिले आहेत.

**पारपत्रसेवा दिवस**

पुण्याच्या प्रादेशिक पारपत्र कार्यालयात पारपत्र सेवा दिवस 2026, साजरा करण्यात आला. 24 जून 1967 या दिवशी देशात, पारपत्र कायदा लागू करण्यात आला होता, त्या निमित्ताने, दरवर्षी या दिवशी, पारपत्र सेवा दिवस साजरा केला जातो. गेल्या दहा वर्षात, पारपत्र सेवा व्यवस्थेचा विस्तार लक्षणीयरीत्या झाला आहे. 2014 मध्ये देशात 77 पासपोर्ट सेवा केंद्रे होती, तर आज पारपत्र सेवा केंद्रे आणि टपाल कार्यालय पारपत्र सेवा केंद्रे मिळून त्यांची संख्या 545 पर्यंत पोहोचली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून आकाश ढगाळ होतं. पुणे जिल्ह्यात घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**